महाराष्ट्र टाइम्स

**Maharashtra Times**
22 Nov 2016

# ५० वर्षांनंतर येऊर पाड्यात स्वच्छतागृहे

## ठाणे महापालिकेच्या उपक्रमातून आदिवासींसाठी शौचालयांची उभारणी

प्रतिनिधी, ठाणे

**ठाणे महानगरपालिकेच्या** योजनेनुसार येऊरमधील आदिवासी पाड्यावर शौचालय बांधणीचा उपक्रम सुरू झाला आहे. तब्बल पन्नास वर्षांपेक्षा अधिक काळ स्वच्छतागृहाच्या सुविधेपासून येथील अनेक पाडे वंचित राहिले आहेत. महापालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांनी या कामी पुढाकार घेताच वर्षानुवर्षे या सुविधेपासून वंचित असणाऱ्या पाड्यावरील नागरिकांनी महापालिकेच्या या योजनेला सकारात्मक प्रतिसाद देत स्वच्छतेच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

जंगलात उघड्यावर नैसर्गिक विधी करताना बिबट्यांच्या हल्ल्यामुळे होणाऱ्या दुर्घटनाही यामुळे कमी होऊ शकतील, असा आशावाद येऊरमधील नागरिक आणि पर्यावरणप्रेमींकडून व्यक्त केला जात आहे. गेल्या काही वर्षात ठाणे शहराने विकासाची कास धरत सुनियोजित शहर होण्याकडे पाऊल उचलले असले तरी शहरापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या येऊरमधील पाड्यावर पन्नास वर्षांहून अधिक काळ स्वच्छतागृहाची सुविधा नव्हती. येऊरमधील जांभूळपाडा, वनीपाडा आणि पाटोणापाडा येथील नागरिक नैसर्गिक विधीसाठी जंगलाचा उपयोग करतात. उघड्यावर शौचास बसलेले असताना बिबट्याच्या हल्ल्यामुळे, सर्प दंशामुळे नागरिकांचा मृत्यू झाल्याच्या घटना यापूर्वी घडल्या आहेत. रात्रीच्या वेळी नैसर्गिक विधीसाठी जंगलात वावर करताना नागरिकांमध्ये देखील दहशतीचे वातावरण असते.

शौचालयाच्या सुविधेसाठी वारंवार प्रशासनाकडे मागण्या करूनही आदिवासी पाड्यावर शौचालयाची सोय उपलब्ध करून दिली जात नव्हती. सार्वजनिक शौचालयासाठी प्रस्ताव केला असता जमीन वनविभागाच्या अखत्यारित असल्याने वनविभागाकडून विरोध दर्शवला जात आहे. अखेरीस पन्नास वर्षांनंतर प्रशासनाला जाग आली असून पाड्यावरील प्रत्येक घरात शौचालय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका प्रशासन प्रयत्न करत आहे.

### उपक्रमाला सामाजिक संस्थांचाही हातभार

पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छता याबाबत येऊरमधील नागरिकांना प्रोत्साहन स्वरूपात महापालिकेच्या योजनेच्या अंतर्गत शौचालय बांधणीसाठी प्रत्येक घरात चौदा हजार रुपये देण्यात आले आहेत. प्रत्येक टप्प्याने हे काम सुरू असून सुरुवातीला दिलेल्या सहा हजारांत नागरिकांनी आपल्या घराच्या जागेत खड्डा खणण्याचे काम सुरू करायचे आहे. खड्डा खणल्याचे छायाचित्र पालिकेकडे सुपूर्त केल्यास पुढील कामाचा निधी नागरिकांना देण्यात येणार आहे. शौचालयाचे काम करण्यासाठी चौदा हजार एवढा निधी अपुरा पडत असून 'रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थ' यांच्या सहकार्याने काही निधी नागरिकांना देण्यात आल्याचे, महापालिकेच्या सूत्रांनी सांगितले.

> सध्या येऊरमधील पाड्यावर शंभरापेक्षा अधिक घरात शौचालय बांधणी पूर्ण झाली असून पर्यावरण स्वच्छतेसाठी ही बाब महत्त्वाची आहे. नागरिकांच्या जीविताच्या दृष्टिकोनातून सकारात्मक योजना आहे. या योजनेचा लाभ पाड्यावरील प्रत्येक नागरिकाने घ्यावा.
>
> -**अपूर्वा आगवान** - 'क्रायसिस फाउंडेशन'